
MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात


पवित्र नातं बहिण भावाचं म्हणजेच भाऊबीज बहिण आपल्या भावाला रितेश ओव्हाळ याला करधुडा बांधून ओवाळताना चिमुकली प्रियांशी उत्तम ओव्हाळ

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –४७ | रविवार दि.०३ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -47 | SUNDAY DT.03 NOVEMBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# मराठा आरक्षणाच्या दंगलीमध्ये अनेक तरुणांवर ३०७ चे खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या आमदार प्रकाश सोळंकेला मत मागताना लाज वाटत नाही का बरं?





- राजकीय वारसदार म्हणून पुतण्याला पुढे करत आमदार प्रकाश सोळंकेने पुतण्याच्या पाठीत खंजीर खुपसला माजलगाव मतदार संघातील जनतेत चर्चाच चर्चा?
- माजलगाव मतदार संघामधील ३०७ चे  खोटे गुन्हे दाखल झालेले तरुण गाव सोडून गेले घरातून बेघर झालेल्या तरुणांचे नातेवाईक, मतदारसंघातील जनता प्रकाश सोळंकेला मतदार करणार का?
- मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आमदार प्रकाश सोळंके यांना फोनवर बोलल्यामुळे एका कार्यकर्त्याने रेकॉर्डिंग व्हायरल केली होती आमदार प्रकाश सोळंकेने त्या तरुणावर ३०७ चा गुन्हा दाखल केला त्यावर माजलगाव मतदार संघामध्ये मराठा समाज बांधव आमदार प्रकाश सोळंकेना मतदान करणार का?
- मला पहा आणि फुल व्हा म्हणणाऱ्या आ. प्रकाश सोळुंके यांनी जातीचा द्वेष निर्माण करत दलित मुस्लिमांच्या मतावर  अनेकदा सत्ता भोगल्या पण आता आमदार प्रकाश सोळंके ला २०२४ ला जनताच घरी बसवणार!
- पुतण्या जयसिंह सोळुंकेने उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे बारामतीला ताफा घेऊन गेल्यानंतर आमदार प्रकाश सोळुंके यांची नाचक्की झाली माजलगाव मतदार संघामध्ये चर्चा रंगू लागल्या!
- आमदार प्रकाश सोळुंके स्वतःच्या पुतण्या भावाचे झाले नाहीत तर आपले कधी होणार माजलगाव मतदार संघातील जनतेला गेल्या ३५ वर्षापासून वेड्यात काढण्याचे काम करत आहेत माजलगाव मतदार संघामध्ये चर्चा रंगू लागल्या !
- शेवटची निवडणूक म्हटले, निवृत्ती घेऊन वारस जाहीर आणि पुन्हा हबुक ठोकली वा,, रे,, दादा
- डायरेक्ट शब्द बदलणारे प्रकाश सोळंके निवडणुकीतील आश्वासनाची पूर्तता करतील कशावरून?

**प्रतिनिधी** । माजलगांव

माजलगाव मतदार संघात विकासाची वानवा आहेच ३५ वर्ष सेवा करण्याची संधी देऊन सुद्धा म्हणावा तसा विकास करता आला नाही आता संधी देऊन तरी कोणता विकास करतील असा सवाल जनताच उपस्थित करू लागली असून आता अनेक आश्वासन दिले जातील परंतु विश्वास तरी ठेवणार कसा गेल्या पंचवार्षिक ला शेवटची निवडणूक म्हणून जाहीर सांगितलोज्जत्तिय निवृत्ती जाहीर करून वारस जयसिंह यांना जाहीर करून पुन्हा डायरेक्ट शब्द फिरवून स्वतःला उमेदवारी घेऊन पुतण्याला धोका देण्याचे काम केले मग हे मतदार संघातील जनतेला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता तरी कशी करतील असा सवाल उपस्थित करत असून यावेळी मात्र सुफडा साफ होईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

माजलगाव मतदार संघात यावेळी चांगली चुरस होणार असून अपक्ष रमेश आडसकर, महाविकास आघाडी कडून मोहन जगताप, तर महायुतीचे प्रकाश सोळंके रिंगणात असून मराठा समाजाच्या आरक्षणाचा मुद्दा सध्या तिव्र असून आरक्षण लढ्यात अनेकांवर खोटे नाटे गुन्हे दाखल झाले, सणासुदीच्या दिवसात युवक जेलमध्ये गेली, याचा रोष अजूनही कायम महायुतीच्या वर कायम आहे, त्यामुळे त्याचा फटका तर प्रकाश सोळंके याना बसणार आहे, शिवाय आता शब्द बदलण्याची सवय गेल्या पंचवार्षिक पासून जनतेच्या लक्षात आली, चक्क शब्द बदलणारा आमदार म्हणून त्यांची तालुक्यात नव्हे तर मतदार संघात चर्चा होत असून, निवडणुकीत दिलेले आश्वासन तरी काय पाळतील याची तरी गॅरंटी आहे का? जो माणूस स्वतःच्या पुतण्याला धोका देऊ शकतो तर इतरांचे काय ? अशी मानसिकता मतदारांची झाली आहे. मग आमदार प्रकाश सोळंके यांनी मराठा समाजासह दलित मुस्लिमांचे अनेक कार्यकर्त्यांवरती मराठा आंदोलनाची वेळी झालेल्या जाळपोळीमध्ये खोटे गुन्हे दाखल केले रेकॉर्डिंग व्हायरल केल्यामुळे फोनवर जाब विचारणाऱ्या तरुणांवरती ३०७सारखे गंभीरपणे दाखल केल्यामुळे अनेकांचे शैक्षणिक आयुष्य बरबाद झालेले आहे तर शैक्षणिक आयुष्य उध्वस्त झाल्याच्या नंतर मतदारसंघातील तरुणांनी माजलगाव सोडून पुणे मुंबई या ठिकाणी कामधंदा करण्याचा निश्चय केलेला आहे माजलगाव मतदार संघातील अनेक गावांमधून अनेक तरुण गाव सोडून गेलेले आहेत तर मातंग समाजाच्या कार्यकर्त्यालाही प्रकाश सोळंकेने गुणतविण्याचे काम करण्यात आलेले आहे त्यामुळे आमदार प्रकाश दादा सोळुंके तुमच्या वर माजलगाव मतदार संघातील मतदारांनी विश्वास ठेवायचा तरी कसा अश्या चर्चांना उधाण आले आहे.

# प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी धनंजय मुंडेंनी परळीतल्या व्यापारी बांधवांसोबत केले लक्ष्मीपूजन साजरे

**प्रतिनिधी** । परळी

**कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मागील अनेक वर्षांपासून जपलेल्या परंपरेनुसार आज आपले लक्ष्मीपूजन परळी वैजनाथ शहरातील व्यापार पेठेतील सर्व व्यापारी बांधवांसोबत साजरे केले. प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी चालत चालत सर्व व्यापार पेठ पिंजून काढत परळी शहरातील विविध व्यावसायिक बांधवांना त्यांच्या व्यवसायाच्या स्थळी भेट देऊन धनंजय मुंडेनी लक्ष्मीपूजनाच्या शुभेच्छा दिल्या.**



## परंपरेनुसार पायी सर्व व्यापारपेठेत मुंडेंची भेट, व्यापारी बांधवांना दिल्या शुभेच्छा बहरती व्यापरपेठ व वाढते उत्पन्न पाहून आनंदी – धनंजय मुंडे

परळी हे विकसनशील शहर आहे. बहरती व्यापारपेठ आणि वाढलेला उद्योग पाहून तसेच व्यावसायिक क्षेत्रात आलेली आधुनिकता पाहून प्रसन्नता वाटते, प्रबोधनाथांच्या कृपेने या मातीतील व्यवसायिकांच्या आणि नागरिकांच्या उत्पन्नात अधिकाधिक भर पडत राहो, असे मत यावेळी धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.यावेळी युवक नेते अजय मुंडे, परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यकांत नाना मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, दीपक नाना देशमुख, जयपाल लाहोटी, रामेश्वर मुंडे, प्रा मधुकर आघाव, श्री देशमुख, डॉक्टर संतोष मुंडे, जयप्रकाश लड्डा, सुरेश मुंडे, गोविंद फड यांसह व्यापारी बांधव उपस्थित होते.




श्री.धर्मराज तुकाराम सोनवणे पोलीस उपनिरीक्षक पोलीस मुख्यालय बीड. यांचे आज महाराष्ट्र पोलीस दलात ३४ वर्ष कर्तव्यदक्ष व प्रमाणिकपणे सेवा करत आज सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त उपस्थित.राहून शुभेच्छा देताना रविंद्र शिनगारे अध्यक्ष पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्र राज्य.



बीड - येथे शितल कलेक्शन साडी सेंटर व चिल्ड्रन्स वेअर स्थलांतरीत भव्य उद्घाटन समारंभ शितल धोंडरे यांना शुभेच्छा देताना फहीम इनामदार, इरफान मोहम्मद, माजेद मोमीन, अजय वाघमारे.

# डॉ.मिलिंद नाना आव्हाड यांच्या पाठिंब्यामुळे मोहन जगतापांचे पारडे जड

## माजलगाव विधानसभेच्या निवडणुकीत गेम चेंजर ची भूमिका डॉ.मिलिंद आव्हाड यांची असणार आहे मोहन जगताप यांना मानवी हक्क अभियान चा जाहीर पाठिंबा

**प्रतिनिधी ।** माजलगांव

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार व महाविकास आघाडीचे उमेदवार मोहन दादा जगताप यांनी डॉ.मिलिंद नाना आव्हाड यांच्या निवासस्थानी भेट घेऊन चर्चा केली.महाराष्ट्राच्या राजकारणातील अग्रगण्य नेतृत्व म्हणजे माननीय प्राध्यापक डॉक्टर मिलिंद नाना आवड यांचं कार्य म्हणजे अख्ख्या महाराष्ट्राला माहिती आहे महाराष्ट्रातच नाही तर दिल्ली सारख्या ठिकाणी देशपातळीवर नेतृत्व करत असताना महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांच मोठ योगदान आहे. मानवी हक्क अभियान संघटनेच्या माध्यमातून तसेच महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी लोकसभेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार व काँग्रेस पार्टी व महाविकास आघाडी यांच्या पक्षाशी एकनिष्ठ राहून काम केलेले आहे. आणि या वेळेस विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार व महाविकास आघाडीचे उमेदवार यांना पाठिंबा मिळणार आहे याचा मोठा फायदा हा महाविकास



आघाडीला होणार असून महाविकास आघाडीचा विजय डॉक्टर मिलिंद आव्हाड यांच्यामुळे सोपा झालेला आहे. ते अठरापगड जातीला सोबत घेऊन काम करत असताना व रोखठोक भूमिका स्पष्ट उत्तर तसेच तरुणांमध्ये त्यांची क्रेझ आहे. त्यांच्या सभेलाही मोठी गर्दी उसळून येते व राजकीय बदल घडवण्याची क्षमता ही मिलिंद आव्हाड यांच्यामध्ये आहे. मागचा इतिहास गवा आहे की माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये मिलिंद आव्हाड जिकडे विजय तिकडे अशी घोषणा कार्यकर्त्यांमध्ये घुमत आहे. माजलगाव च्या विधानसभा निवडणुकीमध्ये डॉक्टर मिलिंद आव्हाड यांनी मोहन जगताप यांना जाहीर पाठिंबा दिलेला आहे त्यामुळे मोहन जगताप यांचा विजय निश्चित झालेला आहे मिलिंद आव्हाड यांच्या शब्दावर मातंग समाजाचे जवळपास पंधरा हजार हे एक गठ्ठा त्यांच्या मतदान होते. तसेच दलित, बौद्ध, मराठा, मुस्लिम, धनगर, वंजारी, कैकाडी, चांभार, लोहार, सुतार, आदिवासी व इतर समाजाचे मतं ते देऊ शकतात एवढी पॉवर मिलिंद आव्हाड यांच्यामध्ये आहे आणि त्यांचं कार्य पण तसंच आहे यामुळे येणाऱ्या काळामध्ये माजलगाव मध्ये तुतारीचा आवाज घुमणार आहे. आणि मोहन जगताप यांच्या विजयामध्ये मोठा वाटा हा मिलिंद आव्हाड यांचा असणार आहे. माजलगाव चा विजय खेचून आणण्यामध्ये मिलिंद आव्हाड यांचा सिंहाचा वाटा असणार आहे. विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी याचा धसका घेतला आहे. माजलगाव विधानसभा निवडणूक ही अत्यंत चुरशीची होणार असून यामध्ये तिहेरी लढत होणार असून यामध्ये मोहन जगतापांचे पारडे हे जड असणार आहे कारण खरी निवडणूक ही प्रकाश सोळंके, मोहन जगताप व रमेश आडसकर यांच्यामध्ये होणार आहे आणि यामध्ये मोहन जगताप यांचा विजय हा सोपा होणार आहे कारण मिलिंद आव्हाड यांचा पाठिंबा म्हणजे काही साधा पाठिंबा नाही. अशी कार्यकर्त्यांमध्ये चर्चा आहे तसेच महाराष्ट्रामध्ये बऱ्याच ठिकाणी मिलिंद आव्हाड यांचं काम असल्यामुळे त्याचा इफेक्ट हा महाराष्ट्राच्या राजकारणावर होणार आहे. मिलिंद आव्हाड हे देशपातळीवर काम करत असताना एक राजकीय विश्लेषक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते व सतत इलेक्ट्रॉनिक मीडिया तसेच चॅनेलवर वारंवार त्यांच्या डिबेट असतात आणि ते राजकीय विश्लेषकाची भूमिका पार पाडतात. कोणत्या घटकाचे मतदान कोणाकडे होणार व कशा पद्धतीने होणार कोणता घटक कोणावर नाराज आहे याचा तगडा अभ्यास असणारे मिलिंद आव्हाड यांनी आपला पाठिंबा मोहन जगताप यांना दिल्यामुळे माजलगाव विधानसभेतील गेम चेंजर मिलिंद आव्हाड हे ठरणार आहेत. मानवी हक्क अभियान संघटनेच्या माध्यमातून हजारो कार्यकर्ते कामाला लागलेले आहेत आणि या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून हजारो मतदान मोहन जगताप यांना करून घेण्याचा निर्धार मानवी हक्क अभियान संघटनेने केला आहे आणि माजलगाव चा इतिहास आहे की मानवी हक्क अभियान संघटना ज्याच्या बाजूने उभी असते त्याचा विजय हा निश्चित असतो.

# उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी प्रा.ईश्वर मुंडे यांच्या वर पक्ष श्रेष्ठींचा दबाव

## राज्य प्रमुख पदाचा राजीनामा देवून निवडणूक लढवणारच - प्रा.ईश्वर मुंडे

**प्रतिनिधी ।** किल्ले धारूर

राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या सेवा निवृत्त अधिकारी सेल चे राज्य प्रमुख,प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी माजलगाव विधानसभेसाठी पक्षाकडे तिकिटाची मागणी केलेली होती.त्या अनुषंगाने माजलगाव विधानसभा मतदार संघात जन संवाद दौरे काढून दांडगा संपर्क वाढवलेला होता परंतू पक्षाने उमेदवारी दिली नाही म्हणून सामान्य जनतेच्या आग्रहास्तव त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून जन संवाद दौरे चालूच ठेवलेले आहेत.

मत विभागणीचा फटका आपल्या अधिकृत उमेदवाराला बसू नये म्हणून प्रा.ईश्वर मुंडे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घ्यावा या बाबत त्यांच्यावर पक्षातील श्रेष्ठींचा दबाब वाढत आहे.परंतू आपणास पक्षाने तिकीट नाकारले तरी सामान्य जनतेचा पाठींबा



आहे.तेच आपले तिकीट आहे.मी अपक्ष, सामान्य जनता हाच आपला पक्ष म्हणत निवडणूक लढवण्यावर ठाम असलेल्या प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी पक्षाच्या राज्य प्रमुख, सेवा निवृत्त अधिकारी सेल या पदाचा व पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांचे कडे पाठवला आहे.प्रा.ईश्वर मुंडे यांच्या उमेदवारीमुळे माजलगाव विधानसभा मतदार संघ निवडणूकीतील रंगत वाढणार आहे.

# बंजारा समाजाची अनोखी दिवाळी अविवाहित मुलींना मानाचे स्थान

**प्रतिनिधी ।** गेवराई

गेवराई : दिवाळी किंवा दिपावली हा प्रकाशाचा हिंदू सण आहे, जो इतर रुपांत इतर भारतीय धर्मांमध्येही साजरा केला जातो. अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक म्हणून या सणाला ओळखतात. कार्तिक महिन्यांत म्हणजेच सप्टेंबर आणि नोव्हेंबरच्या मध्यात दिवाळी साजरी केली जाते. हा उत्सव साधारणपणे पाच ते सहा दिवस चालतो.

हिंदू संस्कृतीमध्ये दिवाळी हा मोठा सण मानला जातो. दिवाळीच्या दिवशी घरोघरी आपापल्या पद्धतीनुसार रितीरिवाजानुसार पूजा विधी केले जातात. घरोघरी फराळाची लगबग, आतिषबाजी आणि नोकरी, रोजगार निमित्त विभक्त झालेली कुटुंब दिवाळी सणानिमित्त एकत्र येतात.

हिंदू संस्कृतीमध्ये दिवाळी म्हटलं की लक्ष्मी पूजन, रांगोळी, मिठाई, फराळ असे सर्व चित्र आपल्या डोळ्यासमोर येते. पण बंजारा समाजामध्ये अविवाहित मुली घोळक्याने दिवे घेऊन फिरतात आणि मेरा मागतात या मागचं कारण म्हणजे बंजारा समाजातील लोक आधी कामासाठी भटकत राहायचे. त्यांचा जिथं मुक्काम



असेल त्याला तांडा म्हणायचे, पण आता हा समाज स्थिरावला आहे. त्यांच्या गावाला आताही तांडा म्हणतात. या तांड्याचा एक प्रमुख व्यक्ती असतो. त्याला नायक म्हणतात. त्यानंतर कारभारी त्या पाठोपाठ ठाव असतो. त्यानंतर तांड्यातील सर्व प्रतिष्ठित व्यक्तींना आसामी म्हणतात.

बंजारा समाजातील दिवाळी ही दोन दिवस साजरी केली जाते. बंजारा गोरीबोली भाषेत दिवाळीचा उल्लेख दवाळी असे करतात अविष्न अमावस्येचा दिवस हा बंजारा समाजातील दिवाळीचा पहिला दिवस असतो. याच दिवशी सायंकाळी तांड्यातील अविवाहित मुली दिवे लावलेली पणती म्हणजेच बंजारा बोली भाषेमध्ये त्याला ढाकळी असं म्हणतात. या पणती हातात घेऊन तांड्यातील नायकाच्या घरी जातात. तिथे त्यांना ओवाळणी करतात. त्यानंतर प्रत्येकाच्या घरी जाऊन ओवाळणी करतात. यावेळी याडी तोण मेरा बापू तोन मेरा वर्शेदाडेरी कोड दावळी बापू तोण मेरा असं बंजारा मुली बोली भाषेत गीत म्हणतात. अर्थात बापू मी तुला ओवाळत आहे. तू मला मेरा दे मी तुला भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे असा त्याचा अर्थ होतो. या मुली प्रत्येकाच्या घरी गेल्यानंतर त्यांना मेरा दिला जातो. मेरा म्हणजे ओवाळणी. त्यावेळी आपापल्यापरीने त्यांना पैसे दिले जातात.

बंजारा समाजातील दुसरा दिवस म्हणजेच गोधनाची पूजा. दिवाळीच्या दुसऱ्या दिवळी भल्या पहाटेच रानात जातात. रानातून तिकडी नावाचे गवत आणि फुले आणतात. त्यानंतर प्रत्येकाच्या घरी गाईच्या शेणापासून गोधण बनवतात. या गोधनावर फुलं आणि गवत रोवून त्याची पूजा करतात. तांड्यातील सर्वच अविवाहित मुली प्रत्येकाच्या घरी जाऊन पूजा करतात. या दिवशी या सर्व मुलींचा उपास असतो. गोधणाची पूजा झाल्याशिवाय त्या अन्नाला स्पर्श सुद्धा करत नाहीत. त्यानंतर तांड्याचा प्रमुख म्हणजे नायक त्यांना जेवणचे आमंत्रण देतो.

मुली घरोघरी देवी घेऊन का फिरतात ?

दिवाळीच्या दिवशी सायंकाळी मुली घरोघरी आणि मंदिरात दिवे घेऊन फिरतात. यावेळी मेरा मागतात. या प्रसंगी घरातील ज्येष्ठांना ओवाळतात. खूप आधीपासून चालत आलेली रुढी परंपरेनुसारची ही प्रथा आहे. त्यामागे विशिष्ट असं कारण नाही पण या समाजात मुलीला लक्ष्मीच्या रूपात बघतात. ही लक्ष्मी दिवा घेऊन ज्याच्या घरी जाईल त्याच्या घराची वृद्धी होते असं त्यामागचा अर्थ असावा असे बंजारा समाजाचे नेते प्रा. पी. टी चव्हाण सर सांगतात.



# विजयसिंह पंडित यांना विधानसभेत पाठवण्यासाठी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष ताकतीनीसी मैदानात : जिल्हाध्यक्ष :- विकास गायकवाड

**प्रतिनिधी ।** गेवराई

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने पक्षप्रमुख आदरणीय संजय भैय्या सोनवणे यांच्या आदेशानुसार गेवराई विधानसभा मतदारसंघ सार्वत्रिक निवडणूक २०२४ राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजितदादा गट व महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह शिवाजीराव पंडित यांनी नुकतीच महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे बीड जिल्हा अध्यक्ष विकास गायकवाड यांच्या गेवराई येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता पक्षातील सर्व पदाधिकारी यांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला व पक्षप्रमुख संजय भैय्या सोनवणे यांच्या आदेशानुसार बीड जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला याप्रसंगी शिवाजीराव डोंगरे ॲड गौतम कांडेकर श्याम काका येवले रवीभैया कानाडे अमोलजी बनसोडे अरुण कांबळे लक्ष्मण उमाप युसुफ शेख खाजाभाई शेख इमरान सौदागर भिवा हातागळे विष्णू हातागळे भागवत जाधव अभिजीत जाधव अनिकेत गायकवाड शरद सरोदे सौरव गायकवाड सुनिताताई बळिद देविदास कांबळे नवनाथ कांबळे कैलास पाटोळे कल्याण कांबळे महादेव कांबळे भाऊसाहेब कांबळे देवराव कांबळे धर्मराज कांबळे कैलास पाटोळे सागर निकाळजे मच्छिंद्र गायकवाड इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते

# विकासात्मक बदलती परळी साकारण्याचे काम करत आलो आणि पुढे करत राहील -धनंजय मुंडे

**प्रतिनिधी ।** परळी

परळी वैजनाथ विकास हा धर्म आणि सेवा ही जात मानून परळीच्या विकासाचा मी वेडा उचलला विकास कामाच्या माध्यमातून बदलती परळी करण्याचे काम मी करत आलो आहे निवडणुकीत दिलेला एक शब्द पूर्ण करणे आणि पुढील विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवणे हेच बिद्र धुराची बाळगून काम करत आलोय आजवर आणि पुढेही करत राहील असे कृषिमंत्री व बीड जिल्हा पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटले धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत परळी शहरातील भोई समाज कोळी समाज माळी समाज राजपूत धोबी समाज आदी समाज बांधवांच्या समाज धनंजय मुंडे आणि संवाद बैठकाच्या माध्यमातून संवाद साधला लक्ष्मी आई सभागृहाचे काम करण्यास मुंबई मिळाली असून सभागृहाचे उर्वरित काम लवकरच पूर्ण केले जाईल असे धनंजय मुंडे यांनी भोई समाजाच्या बैठकीस बोलताना सांगितले महादेव कोळी समाजाला एसटी प्रमाणपत्र मिळावे यासाठी आपण सामाजिक न्याय मंत्री असताना केलेल्या प्रयत्नावर प्रकाश टाकत धनंजय मुंडे यांनी समाज बांधवांसाठी जागा उपलब्ध करून देण्याचा व पी टी आर वर भोगावठादारांना नावे लावून देण्याचा शब्द कोळी समाजाच्या बैठकीत दिला दरम्यान राजपूत धोबी समाजाने संत खंडोबा महाराज मंदिराच्या संत गाडगे महाराज सभागृहाच्या जागेत शेड दोन खोल्या व स्वच्छता आधी उभारण्याची केलेली मागणी आचारसंहिता संपतात पूर्ण जाहीर केली जाईल असे धनंजय मुंडे यांनी राजपूत धोबी समाजाच्या बैठकीत अस्वस्थ केले यावेळी राजपूत धोबी समाज सेवाभावी समितीचे समितीने धनंजय मुंडे यांना या निवडणुकीत जाहीर पाठिंबा दिला आहे समितीच्या वतीने मुंडेंना संत गाडगे महाराजांची प्रतिमा भेट दिली यावेळी माळी समाजाच्या प्रतिनिधी व नागरिकांशी देखील धनंजय मुंडे आणि संवाद साधला तत्पूर्वी श्री मुंडे यांनी श्री संत सावता महाराज मंदिरा मंदिरात सावता महाराजांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले या बैठकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष वैजनाथ सोळंके शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी पठाण सुरेश आण्णा टाक प्राध्यापक काढून अर्धापूर दत्ताभाऊ सावंत विनोद जगतकर महेंद्र रोडे केडी उपाडे जालिंदर नायकवडे एडवोकेट म्हणजे सगळे सय्यद शिराज रवींद्र परदेशी अडसोडे लाला पठाण दत्ता लोखंडे केशव बनसोडे सुदाम लोखंडे बाळासाहेब पाथरकर राजकुमार उत्तम लोखंडे सतीश लोखंडे राधाकिसन बावणे वैद्यनाथ खटमल ऐलोजी खटमल सटवाजी लांडगे गुणाजी गवते राम गवते परमेश्वर मोरे नंदकुमार बळवंत शंकर गंधारे आनंद गंगाधरे पवन बळवंत राजपूत धोबी समाजसेवा समितीचे शंकर शेंद्रे किशोर चौधरी सत्यनारायण सिंग रमेश बुटले राजू सिंह भोसले संजय चौधरी युवराज सिंह चौधरी यांच्यासह विविध समाज बांधव उपस्थित होते.



**प्रतिनिधी ।** गेवराई

**दि. २ नोव्हेंबर - गेवराई तालुक्यातील आंबुनाईक तांडा येथील पारधी वस्तीवर आझाद क्रांती कामगार युनियन संघटनेने पारधी वस्तीवरील सर्व कुटुंबांना दिवाळीच्या फराळाचे वाटप केले तसेच यावेळी महिला आणि लहान मुला मुलींसोबत दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेतला. आझाद क्रांती कामगार युनियनचे कार्यकर्ते मागील १३ वर्षापासून अशा पद्धतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करत आले आहेत.**

या कार्यक्रमासाठी आझाद क्रांती कामगार युनियनचे प्रदेशाध्यक्ष कडूदास कांबळे, प्रदेश उपाध्यक्ष मंगलताई राठोड, प्रदेश सचिव कविताताई डोंगरे, गेवराई तालुका अध्यक्ष मनीषा जवंजाळे, गेवराई तालुका संघटक सुशीला खरात, पत्रकार लक्ष्मण उमाप पारधी समाजाचे कार्यकर्ते संतोष भोसले, नुरकास बिर्याणी यांच्यासह प्रामुख्याने महिला पुरुष आणि लहान मुले-मुली बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी संघटनेचे अध्यक्ष कडूदास कांबळे यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगून शाळेतील मुलांनी दररोज शाळेत गेले पाहिजे तसेच मुला मुलींच्या आई-वडिलांनी आणि पालकांनी मुलांना शिकवण्याचे आवाहन केले. जोपर्यंत आपण शिक्षण घेणार नाही तोपर्यंत आपला गुन्हेगारीचा कलंक जाणार नाही असेही यावेळी त्यांनी सांगितले.

# संत रोहिदास नगर येथे आ. नमिता मुंदडा यांचा महिला संवाद मेळावा पार पडला

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महिलांशी विविध विषयावर चर्चा

तसेच दीपावली सणानिमित्त शुभेच्छा दिल्या.

आशीर्वाद जनतेचा आणि बसा केज विधानसभेच्या प्रगतीचा हे ब्रीद घेऊन आम्ही सातत्यपूर्ण काम करीत आहोत. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, आरपीआय (ए), एसआरपी व इतर मित्र पक्ष महायुतीच्या २३२ केज विधानसभेच्या अधिकृत उमेदवार म्हणून मी, नमिता अक्षय मुंदडा केज विधानसभेतील जनतेच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा निवडणूक लढवित आहे. आपण सदिच्छा, शुभेच्छा व आशिर्वाद द्या अशी साद आ. मुंदडा यांनी उपस्थितांना घातली. खरे तर भाजप महायुती तर्फे केज विधानसभा मतदारसंघासाठी उमेदवारी

अर्ज दाखल केल्यानंतर दीपावली सणाच्या पार्श्वभूमीवर आ.नमिता अक्षय मुंदडा यांनी गुरुवारी अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांच्या भेटी गाठी घेतल्या, त्यांच्याशी संवाद ही साधला. यावेळी संत रोहिदास नगर येथे महिला संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित महिला भगिनींशी संवाद साधताना आ. नमिता मुंदडा यांनी सांगितले की, मागील पाच वर्षांत आम्ही जनतेसाठी पूर्ण वेळ उपलब्ध राहिलो आहोत. या काळात आमचे मार्गदर्शक काकाजी, अक्षयजी व मी आम्ही संपूर्ण कुटुंबियांनी आपल्या सर्वांच्या सहकार्याने केज विधानसभा मतदारसंघातील जनतेची तत्परतेने

सेवा केली. केजच्या जनतेने २०१९

मध्ये मला सर्वप्रथम आमदार केले

त्यानंतर मी व मुंदडा कुटुंबियांनी आपल्या सर्वांच्या सहकार्याने व आशीर्वादाने विकास कामे करून जनसेवा करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. हे आपणा सर्वांना ठाऊक आहे. बघता बघता पाच वर्षे संपली आहेत.



आम्ही पुन्हा एकदा नव्याने निवडणुकीच्या परीक्षेसाठी सज्ज झालो आहोत. आम्हाला विश्वास आहे. की, जनता आम्हाला पुन्हा एकदा पाच वर्षांसाठी निवडून देईल. सर्वांना सोबत घेऊन काम करीत असताना सगळ्या समाजाला न्याय मिळाला पाहिजे अशी आमची सुरूवातीपासूनची भूमिका आजही

यांनी संत रोहिदास नगर येथे व्यक्त

विकासकामांना समोर ठेवून नक्कीच आम्हाला मतदानरूपी आशिर्वाद देतील अशी खात्री आहे. आम्ही महायुती म्हणून सर्व घटक पक्षांना सोबत घेऊन या निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. विकास हाच आमचा मुख्य मुद्दा, प्रमुख अजेंडा आहे. आम्ही मुंदडा कुटुंबियांनी जनतेशी

पाच वर्षांत सातत्यपूर्ण जनसंपर्क ठेवलेला आहे. मूलभूत सुविधा पुरविण्याचा प्रामाणिक प्रयत्न ही केला आहे. या पाच वर्षांत जे काम करता आले नाही. ते पुढील पाच वर्षांत करण्याचा, विषय मार्गी लावण्याचा आम्ही प्रामाणिक प्रयत्न करू असा विश्वास आमदार नमिता अक्षय मुंदडा

केला. यावेळी त्यांनी आयोजित केलेल्या महिला संवाद मेळाव्यास चर्चा केली, महिलांची मते जाणून घेतली. प्रारंभी संत रोहिदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले व त्यानंतर उपस्थित महिला भगिनींनी आमदार नमिताताई यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करीत सहर्ष स्वागत केले. स्वागतानंतर उपस्थित महिलांशी आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आ. मुंदडा यांनी विविध विषयांवर चर्चा केली. याप्रसंगी परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी त्यांच्यासोबत महायुतीतील घटक पक्षांचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अंबाजोगाई प्रतिनिधी - भाजपा, शिवसेना, राष्ट्रबादी काँग्रेस, आरपीआय, एसआरपी च इतर मित्र पक्ष महायुतीच्या अधिकृत उमेदवार आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी गुरुवारी पुन्हा एकदा आपला संवाद, जनसंपर्क कायम ठेवला. अंबाजोगाई शहरातील संत रोहिदास नगर येथे महिला संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. आ. नमिताताई यांनी दीपावली सणानिमित्त सर्व जनतेला शुभेच्छा दिल्या, यावेळी आ. नमिता मुंदडा यांचे उपस्थित महिला भगिनींनी पारंपरिक पद्धतीने आँक्षण केले.



**प्रतिनिधी ।** बीड

महायुतीचे बीड विधानसभेचे अधिकृत उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांनी शहरातील शिवछत्र निवासस्थानी भेट देत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांना दीपावली पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या व आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांनी डॉ.योगेशभैय्यांचा सत्कार करून निवडणूक जिंकण्यासाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

याप्रसंगी राष्ट्रवादी अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, सुनील पाटील, नगरसेवक शुभम धुत, नबील जमा, शुभम कातांगळे, रौफ मोमीन, बाबा खान, सागर वाव्हुळ, अभिनंदन सारडा आदी उपस्थित होते. अमरसिंह पंडित यांनी बीड विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मोठी ताकद असून पक्षाला मानणारा वर्ग असल्याचे सांगितले. आगामी काळात ना.अजितदादा पवार, ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली बीड विधानसभा निवडणुकीत विजय मिळविण्याच्या दृष्टीने रणनीती कशी असावी, यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे आशीर्वाद घेतले.









**जोडपत्र**
**प्रपत्रे क-१ ते सी ८ आणि क/सीएअ**
**प्रपत्र क-१**
**(उमेदवाराने वृत्तपत्रे, दुरदर्शन यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)**
**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणात्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

**उमेदवाराचे नाव व पत्ता** : **स्वप्निल मतधुकर गलधर**
**राजकीय पक्षाचे नाव** : **अपक्ष**
**(अपक्ष उमेदवारांनी येथे अपक्ष असे लिहावे)**
**निवडणुकीचे नाव** : **२३०-बीड विधानसभा -२०२४**
**मतदार संघाचे नाव** : **२३० बीड विधानसभा मतदारसंघ**

मी, **स्वप्निल मधुकर गलधर (उमेदवाराचे नाव)** वर नमुद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असुन, माझा फौजदारी पुर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

| अ.क्र. | (अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्र. व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधीत अधिनियमांचे कलम अधिनियमांची कलमे आणि अपराधाचे (अपराधाचे थोडक्यात वर्णन) |
| १ | १) मा.तिसरे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी-बीड एस.सी.सी.नं.७४०/२०२४ | १) पेठ बीड पोलीस स्टेशन, बीड सी.आर.नं.४७/२०२४ | १) कलम १८८ भादंवि १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम |
| २ | २) मा.नववे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी -बीड आर.सी.सी.नं. ११८/२०२३ | १) बीड ग्रामीण पो.स्टे.बीड सी.आर.नं. सी.आर.नं.३४७/२०२२ | २) कलम ३२४, ३२३,५०४., ५०६ भादंवि |
| | ३) खटला दाखल केलेला नाही | १) पोलीस स्टेशन नेकनुर सी.आर.नं. ४७/२०२४ | ३) कलम १०५(१) (ब)/१८८ भादंवि, १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम ४) कलम १८८, २६९, २७० भादंवि १७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम |
| | ४) मा.सहावे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बीड एस.सी.सी.नं. १६८७/२०२० | ४) पोलीस टेशन पिंपळनेर सी.आर.नं.२५२/२०२० | ४) कलम १८८. २६९, २७० भादंवि १७ महाराष्ट्र पोलीस अधिनियम |
| | ५) मा.तिसरे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बीड एस.सी.सी.नं. ८८७/२०२१ | ५) पोलीस स्टेशन शिवाजी नगर,बीड सी.आर.नं.१२५/२०१९ | ५) कलम १४३, १४५, १४७, ३२३, ५०४, ५०४ भादंवि |
| | ६) मा.पहिले जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड स्टेशन केस २०/२०२० | ६) पोलीस स्टेशन शिवाजी नगर बीड सी.आर.नं.१२६/२०१९ | ६) कलम १४३, १४५, १४७, ३५३, ३३२ भादंवि १३५ मुंबई पोलीस अधिनियम |
| | ७) मा.तिसरे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बीड आर.सी.सी.नं.३०६/२०१४ | ७) पोलीस स्टेशन शिवाजी नगरबीड सी.आर.नं. ६१/२०१४ | ७) १४३, १४७, १४९, ३५३, Indian Penal Law AAW135 Bombay Police Act |
| | ८) खटला दाखल केला नाही | ८) बीड शहर पोलीस स्टे.बीड सी.आर.नं.११४/२०२१ | ८) कलम २७०, २६९, १८८ भादंवि २,३, ४ साथीरोग अधिनियम५१ बी आपत्ती व्यवस्थापन कायदा -२००५ |

**(ब) फौजदारी अपराधांसाठी दोषीसिध्द ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील**

| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| १ | १) मा.तिसरे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी-बीड एस.सी.सी.नं.७४०/२०२४ | दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले नाही. | निरंक |
| २ | २) मा.नववे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी -बीड आर.सी.सी.नं. ११८/२०२३ | दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले नाही. | निरंक |
| ३ | ३) खटला दाखल केलेला नाही | दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले नाही. | निरंक |
| ४ | ४) मा.सहावे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बीड एस.सी.सी.नं. १६८७/२०२० | दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले नाही. | निरंक |
| ५ | ५)मा.तिसरे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बीड एस.सी.सी.नं. ८८७/२०२१ | दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले नाही. | निरंक |
| ६ | ६) मा.पहिले जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड स्टेशन केस २०/२०२० | दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले नाही. | निरंक |
| ७ | ७) मा.तिसरे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बीड आर.सी.सी.नं.३०६/२०१४ | दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले नाही. | निरंक |
| ८ | ८) खटला दाखल केला नाही | दोषारोपपत्र ठेवण्यात आलेले नाही. | निरंक |

**प्रगटन देणार**
**स्वप्निल मतधुकर गलधर**
**अपक्ष उमेदवार, बीड विधानसभा-२३०**

**जोडपत्र**
**प्रपत्रे क-१ ते सी ८ आणि क/सीएअ**
**प्रपत्र क-१**
**(उमेदवाराने वृत्तपत्रे, दुरदर्शन यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)**
**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणात्र**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने २०११ ची रिट विनंती याचिका (दिवाणी) क्रमांक ५३६ (पब्लिक इंटरेस्ट फाऊंडेशन आणि इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

**उमेदवाराचे नाव व पत्ता** : **दिगांबर गणपत मळेकर, मु.पो.आर्वी ता.शिरूर का.**
**राजकीय पक्षाचे नाव** : **अपक्ष**
**(अपक्ष उमेदवारांनी येथे अपक्ष असे लिहावे)**
**निवडणुकीचे नाव** : **२३०-बीड विधानसभा -२०२४**
**मतदार संघाचे नाव** : **२३० बीड विधानसभा मतदारसंघ**

मी, **दिगांबर गणपत मळेकर (उमेदवाराचे नाव)** वर नमुद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असुन, माझा फौजदारी पुर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

| अ.क्र. | (अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्र. व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधीत अधिनियमांचे कलम अधिनियमांची कलमे आणि अपराधाचे (अपराधाचे थोडक्यात वर्णन) |
| १ | जिल्हा व सत्र न्यायालय,बीड | स्पेशल केस क्र.७/२०१८ दि.०९.०५.२०१८ | भा.दं.वि.कलम १४७, १४९, ३३६, ४२७, ५०४, ५०६ व ३(१) (आर) (एस) |

**प्रगटन देणार**
**दिगांबर गणपत मळेकर**
**अपक्ष उमेदवार, बीड विधानसभा-२३०**







हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT